# नट

नांदीनंतर
पडदा उघडला
तेव्हा मी तुडुंब भरलेला होतो
हजारो रंगीबेरंगी शब्दांनी,
शरीरभर रोरावणाऱ्या
      असंख्य आविर्भावांनी,
भीतींनी, आशांनी, अपेक्षांनी,
आता भरतवाक्य संपल्यावर
सर्व प्रेक्षालय रिते झाले आहे
आणि संहितेत नसलेल्या
      प्रयाणाची तयारी करीत
मी उभा आहे
रंगभूमीवर, एकटा,
समोरच्या प्रेक्षालयाप्रमाणे
संपूर्ण रिकामा.

मी उच्चारलेले
काही शब्द, अजूनही
प्रेक्षालयातील धूसर
मंदप्रकाशित हवेवर
पिंजारलेल्या कापसासारखे
      तरंगत आहेत;
माझे काही आविर्भाव
रिकाम्या खुर्च्यांच्या हातांना
बिलगून बसले आहेत;
मी निर्माण केलेले
      हर्षविमर्षाचे क्षण

*पावसाने फांद्यांवर ठेवलेल्या*
*थेंबांसारखे*
*भिंतीच्या कोपऱ्यावर*
*थरथरत आहेत*
*अजूनही.*

*हा एक दिलासा*
*माझ्या रितेपणाला.*
*नाटक संपल्याची खंत-*
*ती आहेच.*
*नाटक नव्हे, तीन तासांचे*
*एक अर्करूप अस्तित्व*
*संपले आहे.*
*पण संपले आहे ते फक्त*
*इथे- माझ्याजवळ.*

*माझ्या त्या अस्तित्वाच्या*
*कणिका घेऊन*
*हजार प्रेक्षक घरी गेले आहेत*

*मी एक होतो*
*तो अंशाअंशाने*
*हजारांच्या जीवनात*
*-कदाचित स्मरणातही-*
*वाटला गेलो आहे.*

*कुसुमाग्रज*
*(मुक्तायन)*

"एकदा नाटक संपलं की उरतं ते रिकामं रंगमंदिर,फ्लॅटस्च्या तुकडयांचे ढीग, कप्प्या-रश्श्यांची भेंडोळी आणि रिकाम्या खुर्च्या. बघवत नाही ते. अगदी उदास वाटतं. काही वेळापूर्वी भरलेल्या या खुर्च्या रडत होत्या, मनमुराद हसत होत्या आणि आता एकदम उदास? यालाच तर नाटक म्हणत नसतील ना? या चक्रात कलाकार देहभान विसरून फिरत असतो. त्याचीच त्याला झिंग येते, यशाची नशा चढते. आज माझ्यामागे अनेक उपाधी लावल्या जात आहेत. नटश्रेष्ठ काय, अभिनयभास्कर काय, नटसम्राट काय.. सारंच खोटं, केवळ धंद्यासाठी. पण खरा मी कोण आहे, कोण होतो हे न विसरणं हेच खरं."
चित्तरंजन कोल्हटकर यांचं हे मनोगत.

आजची ही कविता त्यांना म्हणून दाखवायला पाहिजे होती. कविता किंवा नाटक वाचायचे नसते, म्हणायचे असते; असा त्यांचा ठाम आग्रह असायचा.
त्यांच्या तोंडुन गडकऱ्यांच्या नाटकातली स्वगतं रेकॉर्ड करून ठेवायची होती. भावबंधनपासून ते सही रे सही पर्यन्तच्या नाटकांबद्दलची त्यांची मतं document करायची होती. विजया मेहतांच्या मुद्राराक्षसातल्या चाणक्याबद्दल ते खूप छान बोलायचे. तेही रेकॉर्ड करायचे होते....
खूप गोष्टी ठरवल्या होत्या पण संकोच, आळशीपणा आणि .... अशा अनेक सबबीमुळे ते राहूनच गेले.

चित्तरंजन म्हणजे माडीवाले कॉलनीतल्या आमचे सर्वांचे दादा होते. माझ्या जन्मापासून ते मला ओळखत होते. पण मला ते इतके मोठे नट आहेत हे ओळखायला किंवा कळायला वयाची बरीच वर्षं जायला लागली.

संध्याकाळी दामले बंगल्याच्या दाराशी उभा असलेला आणि मधूनमधून वेळ मिळाला की आमच्याबरोबर क्रिकेट खेळणारा हा गृहस्थ म्हणजे महाराष्ट्रातला इतका जानामाना कलाकार असेल हे कळण्याचे ते वयच नव्हते म्हणा. त्यातही एखाद्याने चिडी खाल्ली तर आमच्यासोबत हमरीतुमरीवर येऊन भांडणारा हा माणूस. त्यांचा आमच्यालेखी तेव्हा असलेला उपयोग संध्याकाळी गल्ली क्रिकेटचे अंपायर किंवा फारतर भरत नाट्य मन्दिरात लागलेल्या बालनाटयांची तिकिटे मिळवून देणारा माणूस एवढाच होता.

मग हळूहळू मोठे होतांना त्यांच्या मोठेपणाची ओळख पटायला लागली. एक शेजारी म्हणून त्यांच्या जाणवलेल्या मोठेपणावर कित्येक पाने लिहिता येतील. पण आज प्रयत्न करणार आहे, त्यांच्या नट म्हणून मला जाणवलेल्या काही गोष्टी सांगण्याचा.

विषवृषाची छाया मधील चिन्तो बापूजी या उतिहाससशोधकाची भूमिका ही त्यांची आवडती भूमिका होती. त्या भूमिकेला ते आपली lifeline भूमिका म्हणत. हे चिन्तो बापूजी तुम्हाला कुठे मिळाले असं विचारताच एकदा दादा मला पुण्याच्या इतिहास संशोधन मंडळात घेऊन गेले. त्या संशोधनाकरता आयुष्य वेचलेल्या आबा चान्दोरकर यांच्याविषयी भरभरून बोलले. आबांमध्ये त्यांना चिन्तो बापूजी कसा सापडला हे अगदी सगळयांच्या समोरच त्यांनी अभिनय करून दाखवून दिले. मग आबा कसे बोलत आणि चिन्तो बापूजी कुठे वेगळे दिसतात हे सांगण्याचा प्रयोगही तिथेच रंगला. त्या मंडळात काम करणारी अनेक मंडळी आजूबाजूला जमा झाली पण दादांना त्याचे भानही राहिलेले नव्हते. सगळं झाल्यावरः समजलं ना? आता आणखी वायफळ प्रश्न विचारू नका. चला घरी असे म्हणून तंबाखू-सुपारीचा बार भरला आणि आपण त्या गावचेच नाही अशा

आविर्भावात तरातरा चालायला लागले. मग मागून आणखी काही फालतू बडबड करीत आमची वरात.

गारंबीचा बापू म्हटलं की आपल्या डोळयासमोर डॉ. घाणेकरांचंच नाव येतं. पण दादांनी बापूची भूमिका फार वेगळया प्रकारे साकारली होती.
बापू हा हॉटेलमधील नोकर आहे, तो दरिद्री आहे. तो राधेकडे आशाळभूतपणे पाहूच शकणार नाही. राधेविषयीच्या त्याच्या भावना दाखविणे हे loud अभिनयाने जमणारच नाही हे त्यांनी त्यांच्या विचारांनी अगदी श्री.ना. पेंडसे यांनाही पटवून दिले होते.
माझ्या मते विजया मेहतांच्या मुद्राराक्षसातील चाणक्याची भूमिका ही त्यांची फार वेगळी आणि सुन्दर भूमिका होती. विजयाबाईंनी केलेल्या अभ्यासाविषयी त्यांना फार कौतुक वाटत असे. भरताच्या नाटयशास्त्रानुसार बसविलेल्या ह्या नाटकाविषयी ते खूप जिव्हाळयाने बोलत असत. मग दादा, आता तुम्ही तशा प्रायोगिक नाटकात का काम करत नाही असं विचारलं तेव्हा “अरे, त्यांची आणि माझी शाळा निराळी. बखलेबुवा आणि ओ.पी. नय्यर यांच्यात जसा फरक तसाच आमच्यात. तसलं काही फार वेळा जमायचं नाही मला.” असं सांगून माझी बोळवण केली.

अतिशय बुद्धिमान नट आणि प्रचंड स्वाभिमानी माणूस इतक्या जवळून मला बघायला मिळाला हा माझ्या आयुष्यातील भाग्ययोगच.

त्यांचा सुधाकर, तळीराम, घनश्याम, चिन्तो बापूजी, गणोजी शिर्के, शंभू महादेव हे आपल्या मनात अंशाअंशाने वाटले गेले आहेत.

या जगाचा निरोप घेतांनाही त्यांच्या मनात एकच प्याला मधील " ***या सुन्दर जगात माझी जागा पुन्हा मला मिळेल का?***" हे सुधाकराचं वाक्य रुंजी घालत असणार.

**मन्दार**